2018-2019

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92, भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | 12 January 2019 | UGC Approved No. 40705

# पेशवे कालीन स्त्रीया व स्त्रिजीवन

प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव
(इतिहास विभाग प्रमुख), बलभीम महाविद्यालय, बीड

---

जगाचा देशाचा राज्याचा आणि राज्यातील छोट्या मोठ्या प्रांताचा इतिहास घडवण्यासाठी अनेक पुरूष समाजसुधारक क्रांतीकार, राजकीय व्यक्ती यांनी कार्य करून प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक भारताच्या इतिहासात आपल्या कार्याच्या माध्यमातून ठसा उमटवून आपले नाव ज्याप्रमाणे अजरामर ठेवले. त्याप्रमाणेच इतिहासाच्या सर्वच कालखंडात मग तो प्राचीन आसो किंवा मध्ययुगीन आधुनिक असो या काळात पुरूषांप्रमाणे कमी जास्त प्रमाणात कार्य करून इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात भारतीय स्त्रियांनी सुध्दा आपले नाव अजरामर ठेवले आहे, आधुनिक कालखंडाचा विचार करता असे दिसते. मराठ्यांच्या इतिहासात राजमाता जिजाऊ ज्या मातेने स्वराज्य निर्माण करणाऱ्या नररत्नाला जन्म देऊन या भुमीत वास्तव्य करणाऱ्या जनतेचा उध्दार केला. एक प्रकारे शिवबाच्या जन्माच्या माध्यमातून इतिहास तयार होणारा विषय पुढे आला. एकंदर मराठेशाहीत म्हणजे 1630 ते 1707 या कालखंडात जिजाबाई शिवाय अनेक स्त्रीयांच्या नावांचा उल्लेख करावा लागेल. त्यामध्ये प्रामुख्यांने राजमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई, उमाताई दाभाडे प्रमाणे पेशवे काळात सुध्दा अनेक स्त्रिया होऊन गेल्या. त्यामध्ये प्रामुख्याने बायजाबाई शिंदे, राधाबाई आनंदीबाई, गोपीकाबाई पेशवे + मस्तानी, आहिल्याबाई होळकर अशा अनेक स्त्रीया पेशवाईच्या काळात होत्या. त्यांनी तत्कालीक घडामोडी आणि परिस्थितीनुसार अनेक पेशव्यांना हेवा वाटेल असे कार्य केल्याचे दिसून येते. त्यांच्या कार्यामुळेच त्या इतिहासात अजरामर राहिल्या आहेत. त्यांच्या कार्याचा संक्षीप्त आढावा या शोधनिबंधामध्ये घेतलेला आहे.

**बाळाजी विश्वनाथाच्या पत्नी (राधाबाई पेशवे) :-** बाळाजी विश्वनाथ हे कोकणस्थ ब्राम्हण ते छत्रपती शाहू महाराजांचे एकनिष्ठ सेवक आणि सरदार होते. त्यामुळे शाहू महाराजांनी इ.स. 1713 मध्ये पेशवाईचे वस्त्रे बाळाजी विश्वनाथ भट्टाकडे सुपूर्द केली. अशा पेशव्यांच्या राधाबाई या पत्नी होय. बाळाजी हे अतिशय कर्तबगार पेशवे होते. त्यामुळे त्यांच्या पत्नी पण पेशवाईतील एक कर्तबगार स्त्री म्हणून तिची ओळख राहिली. त्यांना दोन अपत्ये होती. त्यापैकी पहिला बाजीराव आणि दुसरा म्हणजे चिमाजीआप्पा यांना योग्य मार्गदर्शन करतच त्यांनी राजकारणाचा पण सुक्ष्मपणे अभ्यास केला होता. बाळाजी युध्द मोहिमेवर गेल्यानंतर पुण्याचा सर्व कारभार राधाबाईच पाहत असत. पहिल्या बाजीरावाने जेंव्हा मस्तानी समवेत प्रेमविवाह केला. त्यामुळे त्या अत्यंत दुःखी झाल्या होत्या. त्या गोष्टीचा विरंगुळा पडावा म्हणून 1735-36 मध्ये त्यांनी काशीयात्रा केली. त्यावेळी त्यांनी जो पत्रव्यवहार केला तो सर्व पेशवे दप्तरातून आपणास पहावयास मिळतो. त्यांच्या कुटूंबामध्ये राधाबाई विषयी फार आदर होता. त्या जवळपास 75 वर्षे जिवन जगल्या. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांचा मृत्यू पाहिला. त्यामुळे असे म्हटले जाते की, त्यांना पेशव्यांच्या तिन पिढया पाहण्याचे भाग्य लाभले होते.

**गोपिकाबाई पेशवे :-** पहिला बाजीराव पेशव्यांचे चिरंजीव नानासाहेब पेशवे यांच्या गोपिकाबाई पेशवे या पत्नी होत्या. भिकी नाईक रास्ते हे सातारचे श्रीमंत सावकार होते. त्यांच्या त्या कन्या होत्या. इ.स. 1730 मध्ये त्यांचा विवाह नानासाहेब पेशवे यांच्याशी झाला होता. त्यांना विश्वासराव, माधवराव आणि नारायणराव अशी तीन मुले होती. 1761 च्या पानिपतच्या युध्दात मुलगा विश्वासराव आणि सदाशिवराव भाऊ मारले गेले. त्यामुळे त्या अतिशय खचून गेल्या होत्या. त्यानंतर पानिपतच्या अपयशाने नानासाहेब ही खचले होते ते 5 महिन्यानंतर मरण पावले. त्यामुळे पेशवाईची गादी रिक्त झाली. पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली. पण माधवराव हे अल्पवयीन होते. त्यामुळे गोपीकाबाईच कारभार पाहत होत्या. गोपिकाबाईंना त्या काळात अनेक गृहकलहास तोंड द्यावे लागले होते. त्यांचे वास्तव्य नाशिक जिल्ह्यातील गंगापूर येथेच होते. त्यांनी तेथून केलेला पत्रव्यवहार उपलब्ध आहे. माधवराव पेशवे सुध्दा कालांतराने अकाली गेले. त्यांच्यावर 1772 च्या घटनेने तर मोठा आघात झाला पुढे काही दिवसांनी नारायणरावाचा खून झाला म्हणून आपल्या तिन्ही मुलांचा मृत्यू त्यांना पहावा लागला हे त्यांचे दुर्दैव होय.

**बायजाबाई शिंदे :-** पतीच्या निधनानंतर मागे राहिलेल्या स्त्रीयांनी अनेक वर्षे राज्यकारभार पाहून पतीचे नाव जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्याची अनेक उदाहरणे आपणास इतिहासात दिसतात. पण बायजाबाई शिंदे मात्र या गोष्टीस अपवाद आहेत. बायजाबाई ह्या दौलतराव शिंदे यांच्या पत्नी होत्या. त्या अतिशय बुध्दीमान आणि कर्तृत्ववान स्त्री म्हणून इतिहासात त्यांचे नाव आहे. त्यांच्या कर्तबगारीवर दौलतराव शिंदे सुध्दा समाधानी होते. ते राज्यकारभारात सातत्याने बायजाबाईचा सल्ला घेत असत. दौलतराव शिंदे यांचे निधन झाल्यानंतर बायजाबाइनी राजवैभवाचा त्याग केला होता.हे त्याचे फार मोठेपण होते. द.ब. पारसनीस यांनी महाराणी बायजाबाई शिंदे नावाचा एक छोटेखानी ग्रंथ लिहिला व त्या ग्रंथात बायजाबाई विषयी सविस्तर मांडणी केलेला आहे.

**बिरूबाई, सगुणाबाई, सखवरबाई :-** मराठ्यांचे छत्रपती संभाजीराजे व त्यांच्या पत्नी येसूबाई यांचे चिरंजीव छत्रपती शाहू महाराज त्यांच्या बिरुबाई, सगुणाबाई व सखवरबाई या पत्नी होय. शाहू जेंव्हा औरंगजेबाच्या कैदेत होता. तेंव्हा त्यांचा विवाह झाला होता. बिरूबाई हि शाहूची पत्नी नसली तरी त्यांना शाहू दरबारी मोठा मान होता असे इतिहास सांगता. कारण औरंगजेबाच्या कैदेतून शाहूची मुक्तता झाल्यानंतर सखवरबाई आणि सगुणाबाई यांच्याशी विवाह केला होता. बिरूबाईंना दरबारी मान असण्याचे कारण म्हणजे शाहू महाराजांच्या पत्रांची सर्व उत्तरे तयार करण्याचे काम बिरूबाई करत असत. त्या शाहूशी अतीशय एकनिष्ठ होत्या. पण त्यांच्या निधनानंतर महाराजाना

सखवरबाई, सगुणाबाई यांच्याकडून खूप त्रास झाला. त्यांच्यात अंत:स्थ कलह होता सवती मत्सर होता. त्या दोघींना पण कन्या होत्या. मुल नव्हती. म्हणजे शाहू महाराज यांना मुलगा नव्हता.

रमाबाई :- नानासाहेब पेशव्यांचा मुलगा हा माधवराव यांचा विवाह 1753 मध्ये पुणे येथे रमाबाई यांच्याशी झाला. त्या स्वभावाने अतिशय नम्र व पतीसेवेसाठी तत्पर होत्या. दानधर्म आणि पूजाअर्चेत त्यांचा जास्तीचा वेळ जात असे, त्या खुप धर्मनिष्ठ होत्या. माधवराव पेशव्यांनी आपल्या कारकीदीत पेशवाईला चांगले दिवस आणून दिले होते. अशास्थितीत थेऊर येथे 1772 मध्ये त्यांचे निधन झाले.त्यावेळी रमाबाई सती गेल्या होत्या. त्यांचे वय फक्त 25 वर्षे होते. वयाच्या पंचीविसाव्या वर्षी सती जाणारी पेशवे घराण्यातील त्या पहिल्या होत्या. त्यांनी सती जाताना मोठ्या प्रमाणावर दानधर्म केला होता. रमाबाईचा राजकारणात मुळीच सहभाग नव्हता.

मस्तानी :- पहिला बाजीराव हा बाळाजी विश्वनाथचा मुलगा 18 ऑगस्ट 1700 मध्ये पहिल्या बाजीरावाचा जन्म झाला. कालांतराने 17 ऑगस्ट 1720 मध्ये बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर त्यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. त्याने पालखेड, डभई, भोपाळ इत्यादी ठिकाणच्या युध्दात बाजीरावाने मोठे विजय संपादन केले. बाजीरावांची पहिली पत्नी काशीबाई होत्या. त्या महादजी कृष्ण जोशी यांच्या कन्या होत्या. बुंदेलखंडचा राजा छत्रसाल यांची मस्तानी मुलगी होती. मोगल सरदार मोहंमद शहा बंगश आणि छत्रसाल यांच्यात सातत्याने संघर्ष इ.स. 1728 मध्ये मोहंमद शहा बंगशने छत्रसालला पराभूत केले. तेंव्हा छत्रसालने मदतीसाठी पहिला बाजीराव आणि चिमाजी अप्पा यांना पत्र लिहीले. तेंव्हा बाजीराव लागलीच मदतीसाठी जाऊन बंगशचा पाडाव केला. त्यामुळे छत्रसाल आनंदी झाला व त्याने बाजीरावास 33 लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख आणि हुजारिन नावाच्या राणीपासून झालेली मस्तानी नावाची मुलगी छत्रसालने बाजीरावास देवून 1730 मध्ये तिचा विवाह पार पडला.

आहिल्याबाई होळकर:- सरदार मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडेराव होळकर यांच्याशी आहिल्याबाईचा विवाह झाला होता. इ.स. 1754 मध्ये खंडेराव होळकर युध्दात मरण पावला. त्यावेळेस आहिल्याबाई सती जाण्याचा विचारात होत्या. पण मल्हाररावांनी तिची समजूत घातली आणि सती जाण्यापासून परावृत्त केले. पुढे 1766 मध्ये मल्हाररावाचे निधन झाले. तेंव्हा आहिल्याबाईचा मुलगा मालेराव हा चंचल मग्रूर आणि वाया गेलेला होता. पण 1766 मध्ये त्याचा राज्याभिषेक झाला. पण पेशव्यांनी इंदोर राज्याची खरी सत्ता व अधिकार आहिल्याबाईनाच दिले होते. अशातच एक वर्षाच्या आत मालेरावचे निधन झाले आणि इंदौरचा कारभार आहिल्याबाई पाहू लागल्या. त्यांनी त्यांच्या काळात माहेश्वरीला राजधानीचा दर्जा दिला अशातच इ.स. 1795 मध्ये आहिल्याबाईचे निधन झाले. 13 ऑगस्ट 1795 मध्ये महेश्वर येथे जेंव्हा मृत्यू झाला. त्यापूर्वी त्यांच्यावर सतत संकटाची मालीका चालु होती. पती खंडेरावाचे निधन, सासरे मल्हाररावाचे निधन, मुलगा मालेरावचे निधन, कन्या मुक्ता आणि जावाई यशवंतरावाचा मृत्यू. पण या सर्व संकटावर तिने मात केली आणि वैराग्य अवस्था जोपासली. याच पेशवाईच्या कालखंडातील स्त्रीचा होय.

**संदर्भ**

1) विजया खांडपेकर - ज्ञान- अज्ञान अहिल्याबाई राजहंस प्रकाशन, पुणे.
2) नंदिता गांधी व नंदिता शहा- स्त्री संघर्षाची नवी रुपे, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.
3) अंजली कीर्तने- डॉ. आनंदीबाई जोशी काळ आणि कर्तृत्व मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई 1997.
4) सरिता देहाडराय - जनवादी चळवळीमधील स्त्रीची कथानके व आवाज स्त्री अभ्यास.
5) उज्ज्वला- मेहंदळे - सामान्यांच्या असमान्य सहचारिणी, नवचैतन्य केंद्र प्रकाशन, मुंबई 2003.